
वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. ३० एप्रिल २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडकरांनो, आजच्या बत्तीबंद आंदोलनात सहभागी व्हा

## प्रत्येकानी आपले कर्तव्य समजून केंद्र सरकारच्या निर्णयाचा निषेध करा




वक्फ विधेयकाच्या विरोधात आंदोलन

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता







बीड, (दिव्य न्युज):-केंद्र सरकारने वक्फ विधेयक आणले असून या विधेयकाला मुस्लिम समाजाकडून विरोध होत आहे. विधेयक रद्द करावे अशी मागणी केली जात असून त्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीचे आंदोलन करण्यात येत आहेत. आज रात्री ९ ते ९.१५ या दरम्यान देशभरात बत्तीगुल आंदोलन करण्यात येणार आहे. सदरील हे आंदोलन मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड यांच्या वतीने करण्यात येणार आहे. या आंदोलनाला मज्लीस ए उलेमा बीड, वक्फ बचाव कमिटी यांचे समर्थन असून बीडमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन मज्लीस उलेमा ए बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने गेल्या काही दिवसापुर्वी वक्फ विधेयक आणलेले आहे. हे विधेयक अन्याय कारक असून सदरील विधेयक रद्द करावे अशी मागणी मुस्लिम समाज व विविध मुस्लिम संघटनांकडून केली जात आहे. त्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीचे आंदोलन ही केले जात आहे. मध्यंतरी प्रत्येक जिल्हा पातळीवर मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. आज रात्री

▸▸ पान २ वर

# जनगणनेसोबतच जातीनिहाय जनगणना होणार ?

## मोदी सरकारचा मास्टर स्ट्रोक, कॅबिनेट बैठकीमध्ये घेतला मोठा निर्णय

दिल्ली, (वृत्तसेवा):- जम्मू काश्मीरच्या पहलगामध्ये २२ एप्रिलला मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यामध्ये २६ लोकांना आपला जीव गमवावा लागाला. तर अनेक जण जखमी झाले. या हल्ल्यानंतर दोन्ही देशांमध्ये तणावाचं वातावरण आहे. या सर्व पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला असतानाच बुधवारी केंद्रीय कॅबिनेटची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीमध्ये ज्या नागरिकांचा पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्यू झाला, त्यांना श्रद्धांजली देखील अर्पण करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीनंतर सूचना आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसारमाध्यमांना बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती दिली. गेल्या अनेक दिवसांपासून जातीनिहाय जनगणनेची मागणी होतं होती, अखेर याच मागणीबाबत आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला



आहे. आगामी जगणननेसोबतच जातीनिहाय जनगणना देखील करण्यात येणार आहे.दुसरा मोठा निर्णय म्हणजे केंद्र सरकारकडून ऊस पिकासाठी एफ आर पी जाहीर करण्यात आला आहे. प्रति क्विंटर ३५५ रुपयांचा एफआरपी जाहीर करण्यात आला आहे.

यासोबतच कॅबिनेट बैठकीमध्ये मेघालय आणि आसामला जोडणाऱ्या शिलाँग-सिलचर १६६.८ किलोमीटर लांबीच्या चरा -लेन कॉरिडॉर महामार्गासाठी २२,८६४ कोटी रुपयांच्या खर्चाला देखील मंजुरी देण्यात आली आहे.जम्मू -काश्मीरच्या पहलगामध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सिंधू नदी कराराला स्थगिती देण्यात आली आहे. अटारी बॉर्डर बंद करण्यात आली आहे, तसेच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, त्यांना देश सोडण्याचा आदेश देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये तणावाचं वातावरण आहे. त्यामुळे या बैठकीकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. या बैठकीमध्ये तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. त्यामध्ये ऊसाला एफआरपी देण्यात आली आहे, तसेच जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यात आला आहे, आणि मेघालय आणि आसामला जोडणाऱ्या महामार्गाच्या निधीसाठी मंजुरी देण्यात आली आहे.

# बीड विधानसभेतील पंकजाताईंच्या मंडळ अध्यक्षांचा सलीम जहाँगीर यांच्यावतीने सत्कार

बीड, (दिव्य न्युज):- भाजप नेत्या तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघातील भाजप मंडळ अध्यक्षांचा निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अशोक लोढा, मनोज पाटील,अशोक रसाळ यांच्या निवडी जाहीर केल्या. त्या अनुषंगाने भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी नवनियुक्त शिलेदारांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि




लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर

▸▸ पान २ वर

# मुस्लिम तरुणीशी लग्न, ब्युटी पार्लर चालवते बायको

## बीसीसीआयने हकालपट्टी केलेल्या अभिषेक नायरची फिल्मी लव्हस्टोरी

मुंबई , (दिव्य न्युज):- यंदाच्या आयपीएलमध्ये भारताचा माजी क्रिकेटर अभिषेक नायर प्रचंड चर्चेत आहे. कारण टीम इंडियाच्या अस्टिस्टंट कोच बनवण्याच्या आठ महिन्यानंतर त्यांची बीसीसीआयने हकालपट्टी केली होती. पण यानंतर लगेचच त्यांना केकेआरने सपोर्ट स्टाफमध्ये जागा दिली.यानंतर आता त्यांना टी२० मुंबई क्रिकेट लीगमध्ये देखील मोठी जबाबदारी मिळाली. या दरम्यान नायर यांच्या वैयक्तिक आयुष्याची प्रचंड चर्चा रंगली आहे. ▸▸ पान २ वर



# वाल्मिकनंतर बीडमध्ये आणखी एक गँग अॅक्टीव्ह

## चाकू-तलवारी दाखवून माजवली जातेय दहशत

**बीड, (दिव्य न्युज):- मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा गुन्हेगारी घटनांसाठी चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. अलीकडेच बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अमानुष हत्या करण्यात आली आहे. वाल्मीक कराड गँगने दोन कोटींची खंडणी आणि दहशत माजवण्याच्या हेतून देशमुखांची हत्या केल्याचं तपासातून समोर आलं होतं. आता वाल्मीक कराडसह त्याची टोळी बीड जिल्हा मध्यवर्ती कारागृहात बंद आहे.**



वाल्मीक कराड तुरुंगात बंद असताना आता बीडमध्ये आणखी एक गँग क्टीव्ह झाली आहे. बीडमध्ये गेल्या काही काळात वाल्मीक कराड गँगसह वाळू माफिया, राख माफिया यांची दहशत पाहायला मिळाली होती. याबाबतच्या अनेक बातम्या समोर आल्या होत्या. या घटना ताज्या असताना आता बीडमध्ये पाणी माफीयाची दहशत देखील समोर आली आहे. पाणी माफीयाकडून पालिका कर्मचाऱ्यांना चाकू आणि तलवारीचा धाक दाखवून धमकावलं जात असल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडला माजलगाव प्रकल्पातून पाणीपुरवठा होतो. या ठिकाणाहून जी जलवाहिनी बीडपर्यंत येते, त्या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू आहे. यामुळे बीडच्या अनेक भागात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. बीड शहरातील ईदगाह परिसरात असलेल्या ▸▸ पान २ वर

# बीडमधील त्या घोटाळेबाज शिक्षण संस्था चालकाच्या तंबूत घबराट

## राज्याला हादरवणाऱ्या शिक्षण घोटाळ्याची ईडीने मागविली माहिती

मुंबई , (दिव्य न्युज):- संपूर्ण राज्याला हादरविणाऱ्या शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळा व अपात्र मुख्याध्यापक भरती घोटाळ्याची आता ईडीकडूनदेखील दखल घेण्यात आली आहे. ईडीने या घोटाळ्याशी निगडीत माहिती पोलिसांकडून मागविली आहे. दरम्यान, या प्रकरणाची पाळेमुळे खणण्यासाठी एसआयटीदेखील गठीत करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे या घोटाळ्याशी निगडीत असलेल्यांना घाम फुटला आहे. अनेक मोठे अधिकाऱ्यांचे भांडे यात फुटू शकते. लोकमतकडे ईडीच्या पत्राची प्रतदेखील असून यामुळे प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढली आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्यात सायबर पोलिस ठाण्याकडून तांत्रिक पद्धतीने तपासावर भर देण्यात येत आहे. उपसंचालक उल्हास नरड व वरिष्ठ लिपिक सूरज नाईक यांच्या चौकशीतून अनेक बाबी समोर आल्या होत्या. अस्तित्वात नसलेल्या शिक्षकांच्या नावाने बोगस

### एसआयटीगठीत करण्याच्या हालचालींना वेग

शालार्थ आयडी तयार करण्यात आले होते व अनेक वर्षांपासून पगाराची उचल सुरू होती. सायबर पोलिसांनी

▸▸ पान २ वर

# धर्म विचारुन खरेदी करा म्हणणाऱ्या चौघांवर सोलापुरात गुन्हा दाखल

सोलापुर , (दिव्य न्युज):- शहरात विशिष्ट धर्माच्या व्यापाऱ्यांकडूनच खरेदी करण्याचे आणि इतरांवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचे आवाहन करणारे फलक घेऊन फिरणाऱ्या तरुणांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई केली आहे. याप्रकरणी चार तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पान २ वर

# सिमेंट ब्लॉक बनवणाऱ्या कंपनीमध्ये चक्क ड्रग्ज फॅक्टरी

## ८ कोटींचा मुद्देमाल जप्त

मुंबई , (दिव्य न्युज):- मुंबईच्या साकीनाका पोलिसांनी ड्रग्ज विरोधात मोठी कारवाई करत तब्बल ८ कोटींचा चऊड्रग्ज जप्त केलं आहे. वसई कामन गाव परिसरात एमके ग्रीन सिमेंट ब्लॉक बनवणारी कंपनीमध्ये एमडी ड्रग्ज बनवणारी फॅक्टरीवर ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. ▸▸ पान २ वर

# वक्फ बोर्ड कार्यालयाच्या कामाला इम्तियाज जलील यांचा विरोध

# आमखास मैदानावर काम थांबवले





औरंगाबाद , (दिव्य न्युज):-औरंगाबादमध्ये होत असलेल्या वक्फ बोर्डाच्या कार्यालयाच्या कामाला माजी खासदार इम्तियाज जलील यांनी विरोध केला आहे.औरंगाबादमध्ये आमखास मैदानावर वक्फ बोर्डाच्या कार्यालयाच्या कामाला सुरुवात झाली आहे. वक्फ बोर्डाच्या कार्यालयाच्या कामाला एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी विरोध केलेला आहे. आमखास मैदानावर जेसीबी आणि इतर बांधकाम वाहनांच्या सहाय्याने सुरू करण्यात आलेलं होतं. याठिकाणी खड्डा देखील खोदण्यात आलेला होता. मात्र माजी खासदार इम्तियाज जलील यांनी या कामाच्या ठिकाणी येऊन कमाल विरोध दर्शवत हे काम बंद पडलं आहे. आमखास हे संभाजीनगरमधील सर्वात मोठे मैदान असून या ठिकाणी वक्फ बोर्डाच्या कार्यालयाची उभारणी करण्यात येणार होती. मात्र आता जलील यांच्याकडून बांधकामासाठी खोदण्यात आलेला खड्डा बुजवण्यास सांगितला जात आहे. हे काम होऊ देणार नाही, अशा प्रकारची भूमिका इम्तियाज जलील यांच्याकडून घेण्यात आलेली आहे.



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या गडकिल्ले माती व नद्यांचे जल-कुंभ या रथयात्रेचे बीडमध्ये बुधवारी दुपारी १ वाजता उत्साहात स्वागत करण्यात आले.संयुक्त महाराष्ट्र स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण होत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसकडून संपूर्ण राज्यात महाराष्ट्र महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्र गौरव रथयात्रा काढण्यात आली आहे.राष्ट्रवादी गौरव रथयात्रेच्या माध्यमातून राज्याच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या महाविभूतींचा परिचय नव्या पिढीसमोर येणार आहे. इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# अंबानी सोडणार १५००० कोटींचं राहतं घर ?

## ॲन्टीलियाच्या जमिनीची मालकी

मुंबई , (दिव्य न्युज):-मुंबईमधील अँटेलिया हे आशियामधील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या मुकेश अंबानींचं आलिशान घर आहे. या घरामध्ये मुकेश अंबानी पत्नी निता अंबानी आणि मुलं, सुनांबरोबर राहतात. जगातील सर्वात महागडं खासगी निवासस्थान असलेल्या अँटेलियाची किंमत १५ हजार कोटी रुपये इतकी आहे. जगभरामध्ये या घराबद्दल विशेष उत्सुक्ता आहे. मात्र अंबानींच्या या २७ मजली घरासंदर्भात एक वेगळीच माहिती समोर आली आहे.

अंबानींचं हे १५ हजार कोटींचं घर एका अनाथाश्रमशीसंबंधित जमिनीवर उभारण्यात आलं आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष अनिल अंबानी यांनी २००५ साली ही जमीन विकत घेतल्यापासून ती वादात अडकली होती. मिळालेल्या माहितीनुसार, अँटेलिया ज्या जमीनीवर बांधण्यात आलं आहे ती जमीन चुरीमभॉय इब्राहिम यतिमखाना या अनाथाश्रमाच्या नावावर होती. या जमिनीचे मूळ मालक प्रसिद्ध उद्योज सर फिरोजभॉय चुरीमभॉय इब्राहिम हे होते. खोजा मुस्लिम समाजातील चुरीमभॉय यांनी १८९५ साली त्यांच्या समाजातील अनाथ आणि बेवारस मुलांसाठी हे आश्रम बांधलं होतं.

**वक्फ बोर्डाकडे आलं नियंत्रण**

त्यानंतर पुढील काही वर्षांमध्ये चुरीमभॉय अनाथाश्रमचं नियंत्रण आणि व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे आलं. वक्फ बोर्डाला ही जमीन २००२ साली मुकेश अंबानींच्या मालकीच्या मुफिन-अँटेलिया कमर्शिअल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला विकण्याची परवानगी मिळाली.

मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये, मुकेश अंबानींना 'बेकायदेशीरपणे' २००५ साली विकण्यात आलेल्या जमिनीवर अँटेलियाची आलिशान इमारत उभारण्यात आली आहे, असा दावा करण्यात आलेला. 'लाइव्ह लॉ'ने दिलेल्या वृत्तानुसार, हे प्रतिज्ञापत्र संदेश तडवी यांनी सादर केलं होतं. अल्पसंख्यांक विकास विभागाचे सहाय्यक सचिव असलेल्या संदेश आणि त्यावेळीच्या महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या कार्यकारी मुख्य अधिकाऱ्यांनी या जमिनीचा व्यवहार झाला तेव्हा तत्कालीन अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मुकेश अंबानींना जमीन विकली होती तेव्हा फेरफार केलेला असा दावा, प्रतिज्ञापत्रात करण्यात आलं.

**राज्य वक्फ बोर्डाने अँटेलियाला पाठवली नोटीस**

त्यावेळी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने हा जमिनीचा व्यवहार बेकायदेशीर असल्याचं सांगत अँटेलिया कमर्शिअलला नोटीस पाठवली होती. यामध्ये त्यांनी वक्फ कायदा १९५२ मधील कलम ५२ चं उल्लंघन केल्याचं नमूद केलेलं. यामध्ये वक्फ बोर्डाच्या परवानगीशिवाय कोणतीही स्थावर मालमत्तेच्या खरेदी विक्रीचा व्यवहार करता येत नाही. तसं केल्यास ते बेकायदेशीर मानलं जातं, असं सांगण्यात आलेलं.

**वक्फ ट्रेब्युनलसमोर झाली सुनावणी**

२००४ साली २२ एप्रिल रोजी वक्फ ट्रेब्युनलसमोर या नोटीसला आवाहन देण्यात आलं. यावेळेस राज्य वक्फ बोर्डाच्या सीईओंनी ट्रस्टबरोबरचा हा वाद मिटवला आणि ट्रस्टींनी ही जमीन वक्फ बोर्डची संपत्ती होती असं स्वीकारण्यास होकार दर्शवावा असं ठरवण्यात आलं. वक्फ कायदा १९९५ मधील कलम ७२ नुसार दरवर्षी वक्फ बोर्डाला १६ लाख रुपये देण्याचे निर्देश वक्फ ट्रेब्युनलने दिले. आधी ट्रस्टने सध्या अँटेलिया उभी असलेली जमीन ही वक्फच्या मालकीची नसल्याचा दावा ट्रस्टने केलेला. मात्र नंतर हा दावा त्यांनीच मागे घेतला.

**ओवैसींचं विधान**

एआयएमआएमचे नेते आणि हैदराबादचे खासदार अससुद्दीन ओवैसी यांनी अंबानींचं अँटेलिया हे आलिशान घर उभं असलेली जमीन ही केवळ चॅरिटेबल कामांसाठी वापरण्याची मूभा आहे असं विधान नुकतेच केलं होतं. मात्र ट्रस्टने नियम मोडून ही जमीन मुकेश अंबानींनी विकल्याचं ओवैसींनी म्हटलं होतं.

पान १ वरून

## अवैध गुटखा वाहतूक करणारा

दिली असता त्यांनी तात्काळ स्था.गु.शा. चे पथक तयार करून मार्गदर्शक सुचना व कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यावरुन पोनि विवेकानंद पाटील व त्यांच्या पथकाने पांढरी येथे छापा टाकला. आरोपी हा त्याची स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच ४६ झेड ७६०३ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला अवैध गुटखा वाहतूक करताना मिळून आला. त्याच्या ताब्यातून कार व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला अवैध गुटखा राजनिवास कंपनीचा गुटखा, व्ही-१ तम्बाकू, प्रिमियम जेड एल-०१ जाफरानी जर्दा, केसर युक्त गोवा १००० असा एकूण ४ लाख २४ हजार ९०२ रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करून आरोपीस पोलीस ठाणे ताडकळस येथे हजर केले. ज्याच्याकडून गुटखा खरेदी केला अशा दोघांविरूध्द कलम १२३,२२३,२७४,२७५ ,३ (५ ) भा.न्या.सं. २०२३ सह क.५९ अन्नसुरक्षा मा.न.के. कायदा २००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पो.नि.विवेकानंद पाटील, पोउपनि श्री. चंदनसिंग परिहार, पोलीस अंमलदार रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, गजानन क्षीरसागर, हनुमान ढगे व सायबर चे गणेश कौटकर यांनी मिळून केली.

अश्याच प्रकारची कार्यवाही जिंतूर तालुक्या सह शहरात होने गरजेचे झाले आहे तालुक्यात व शहरात खुले आम मटका जुगार सुरू असुन बिनधास्तपणे मटका घेणारे चालून फिरून मटका घेत आहे व तबाखुजन्य पदार्थ - गोवा, जाफरानी जर्दा माणिकचंद, विमल गुटखा, प्रत्येक पानटपऱ्यावर व येलदरी रोड, चिद्रवार कॉमलेक्स कडे जाणाऱ्या रस्त्यावर सर्रास पणे विक्री होत आहे तरुण युवक, वयस्कर नागरीकांच्या ह्या तबाखुजन्य पदार्थामुळे भयंकर आजार होऊन शरीरावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पान १ वरून

## बीडकरांनो, आजच्या

बत्तीगुल आंदोलन करण्यात येणार आहे. ९ ते ९.१५ पंधरा मिनट दिवे बंद करून केंद्र सरकारचा निषेध केला जाणार आहे. सदरील या आंदोलनाचे आयोजन मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या आंदोलनाला मज्लीस ए उलेमा बीड, वक्फ बचाव कमिटी चे समर्थन असून ते आंदोलनात सहभागी होणार आहेत. आजच्या या आंदोलनामध्ये सर्व समतावादी, मानवतावादी व धर्मनिरपेक्ष विचार श्रेणीच्या नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मज्लीस उलेमा ए हिंदचे सचिव मुफ्ती मोहंमद अन्वर नोमानी यांनी केले आहे. दरम्यान नागरीकांनी ९ ते ९.१५ या पंधरा मिनिटाच्या काळात आप आपल्या घरातील, दुकानातील किंवा अन्य उद्योगातील लाईट बंद ठेवून या आंदोलनात सहभाग नोंदवावा आणि वक्फ सुधारणा विधेयकाविषयी आपली नाराजी शांततेने व लोकशाही मार्गाने व्यक्त करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## बीड विधानसभेतील

मंडळ अध्यक्षपदी अशोक लोढा, तालुका मंडळ अध्यक्षपदी मनोज पाटील, अशोक रसाळ यांची नियुक्ती जाहीर केली आहे. भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात मंडळ अध्यक्ष अशोक लोढा, मनोज पाटील , अशोक रसाळ यांच्या हृदय सत्कार करण्यात आला. यावेळी मंत्री बँकेचे बँकेचे चेअरमन आदित्यसेठ सारडा,जिल्हा संघटक महामंत्री प्रा. देविदास नागरगोजे सर, जिल्हा कोषाध्यक्ष चंद्रकांत बप्पा फड, भाजप नेते उज्वलसेठ कोटेचा, नूरलाला खान , वामन मुंडे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## मुस्लिम तरुणीशी

नायरची बायको कोण?

अभिषेक नायरचा विवाह एका मुस्लिम मुलीशी झाला आहे. त्याच्या पत्नीचे नाव नताशा शेख आहे, जी एक व्यावसायिक हेअर आणि मेकअप आर्टिस्ट आहे. अभिषेक नायर आणि नताशा शेख यांची प्रेमकहाणी खूपच फिल्मी आहे.अभिषेक नायर केस कापण्यासाठी नताशाकडे गेला होता, जिथे दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यानंतर या भेटीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि नंतर दोघांनीही ७ जून २०१४ ला लग्नगाठ बांधली होती.नताशा हेअर गॅरेज नावाचा सलून ब्रँड चालवते, जिथे बॉलिवूडच्या टॉप अभिनेत्री स्पासाठी येतात. नताशाला तिचे आयुष्य खाजगी ठेवायला आवडते, सोशल मीडियावर तिच्याबद्दल फारशी माहिती नाही.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अभिषेक नायर यांना सहाय्यक प्रशिक्षकपदावरून काढून टाकून मोठा धक्का दिला होता. पण त्यांच्या जुन्या आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाईट रायडर्सने त्यांना लगेच परत बोलावले. तुम्हाला आठवत असेल की आयपीएल २०२४ मध्ये केकेआरने १० वर्षांचा दुष्काळ संपवून ट्रॉफी जिंकली होती. त्यावेळी केकेआरचे मार्गदर्शक गौतम गंभीर यांनी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षकपद स्वीकारले तेव्हा त्यांनी अभिषेक नायर यांना त्यांचे सहाय्यक बनवले होते.

## वाल्मिकनंतर बीडमध्ये

जलकुंभावर पाणी उपलब्ध आहे. परंतु या ठिकाणी खासगी टँकर चालक आणि काही स्थानिक लोकांची दहशत निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.

मलाच आधी पाणी पाहिजे, असे म्हणत इथे ड्युटीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना चाकू, तलवारीचा धाक दाखला जात आहे. यामुळे आता मुख्याधिकाऱ्यांनी या ठिकाणी पोलीस संरक्षण मागितले आहे. दुसरीकडे, या ठिकाणी काम करणारे कर्मचारी प्रचंड दहशतीत असून आम्हाला पोलीस संरक्षण द्या, तरंच आम्ही ड्युटी करू, अशी भूमिका घेतली आहे. वाल्मीक कराड, वाळू माफिया, राख माफियानंतर बीडमध्ये पाणी माफियाची नवी गँग ॲक्टीव्ह झाल्याने बीडमधील गुन्हेगारी पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरत आहे.

## बीडमधील त्या

एनआयसी, महाआयटी सर्व्हरमधून मागितली माहिती मागितली असून आहे.

शालार्थ आयडी तयार करण्याची प्रक्रिया शिक्षण विभागाच्या बाहेरील संगणकातून झाली असल्याचे सायबर पोलिसांच्या तपासांतून समोर आले. या प्रकरणाची व्याप्ती शेकडो कोटींमध्ये जाण्याची शक्यता आहे. हीच बाब लक्षात घेऊन ईडीने पोलीस आयुक्त कार्यालयाकडून या प्रकरणाच्या गुन्ह्याची प्रत व इतर माहिती मागविली आहे. यात आरोपींचे बयाण, झालेल्या झडतींचे तपशील, आरोपींच्या बँक खात्यांचे तपशील, त्यांच्या मालमत्तांची माहिती तसेच रिमांड ऑर्डरबाबत सविस्तर माहितीचा समावेश आहे. ईडीचे सहायक संचालक एम.अशोक यांनी याबाबत पत्र लिहून ही माहिती मागविली आहे.दरम्यान, राज्य शासनाने या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यासाठी पावले उचलली आहेत. यात तपास अधिकारी, शिक्षण विभागातील दोन अधिकारी, पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी तसेच अशासकीय सदस्य यांचा समावेश असण्याची शक्यता आहे.

संचालकांना सुगावा लागला कसा नाही?

दरम्यान, शिक्षणतज्ज्ञ ड विजय गुप्ता यांनी या प्रकरणात शिक्षण विभागाच्या संचालकांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मागील अनेक वर्षांपासून पदभरती बंद आहे. तरीदेखील वेतनाचे बजेट वाढले. यात संचालकांना काहीच वावगे कसे वाटले नाही. अनेक कोटींची रक्कम बॅक डेटेड काढण्यात आली व तरीदेखील संचालकांना सुगावा कसा लागला नाही, असा सवाल त्यांनी केला आहे.

## धर्म विचारुन खरेदी

पार्श्वभूमीवर, दोन समाजात तेढ वाढवणाऱ्या पोस्ट समाज माध्यमांवर व्हायरल होत होत्या. याच दरम्यान, सोलापूर शहरातील नवी पेठ परिसरातील एक व्हिडिओ समोर आला. यामध्ये काही युवक सायंकाळी हातात फलक घेऊन उभे असलेले दिसत होते.

या फलकांवर, त्यांनी धर्म विचारून गोळ्या घातल्या, तुम्ही धर्म विचारून खरेदी करा, जात नव्हे धर्म विचारला, अशा आशयाचा मजकूर लिहिला होता. हा व्हिडिओ व्हायरल होताच, पोलिसांनी स्वतःहून याची दखल घेत कारवाई केली.

या प्रकरणी पोलिसांनी एकूण चार तरुणांवर गुन्हा दाखल केला आहे. यापैकी दोघांची चौकशी पूर्ण झाली असून, उर्वरित दोघांना मंगळवारी पोलीस उपायुक्तांसमोर हजर केले जाणार आहे. या तरुणांच्या वयाची पडताळणी सध्या सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी दिली.पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी सांगितले की, नवी पेठेतील व्हिडिओ आमच्यापर्यंत पोहोचला आहे. सार्वजनिक शांततेला गालबोट लागणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी. शहर गुण्यागोविंदाने नांदावे यासाठी सर्वांनी यंत्रणेला सहकार्य करावे. या प्रकारामुळे शहरात तणाव निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.

## सिमेंट ब्लॉक

वसईमध्ये सिमेंट बनवणारी कंपनीमध्ये एमडी ड्रग्ज बनवला जात असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई चा बडगा उगारत तीन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणामुळे मुंबईतील ड्रग्जचे आणखीन एक कनेक्शन उघड झाले असून सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

पुढे आलेल्या माहितीनुसार, या कारवाईमध्ये चार किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे. या चार किलो चऊ ड्रग्जचा बाजार भाव जवळपास ८ कोटी रुपये असल्याचं माहिती मिळत आहे. या कारवाईमध्ये पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. तर अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सादिक शेख, सिराज पंजवाणी आणि सय्यद इराणी असे आहेत. हे सराईत आरोपी असून या आरोपीवर वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. साकीनाका परिसरात चऊ ड्रग विकणारा एका आरोपीला साकीनाका पोलिसांनी अटक केली होती, या आरोपीकडून ही वसईची फॅक्टरी बद्दल माहिती मिळाली होती. यामध्ये मुख्य आरोपी फरार असून त्याच्या शोध साकीनाका पोलिसांकडून घेतला जात आहे.

बार्शीतल्या ड्रग्स प्रकरणाची व्याप्ती वाढताना पाहायला मिळतेय. या प्रकरणी आधीच ९ आरोपीचें नावे निष्पन्न असताना पोलिसांनी आणखी तिघांना आरोपी केलंय. यामध्ये परांडा येथील मस्तान शेखसह साजिद मुजावर आणि शेळके नावाच्या व्यक्तीला आरोपी म्हणून सहभागी करण्यात आलंय. मात्र हे तिघे आरोपी अद्याप फरार आहेत. १८ एप्रिल रोजी बार्शीत २० ग्राम एमडी ड्रग्ससह पोलीसांनी तिघांना अटक केली होती. त्यानंतर या संपूर्ण ड्रग्स रॅकेटचा भांडफोड पोलिसांनी केलाय.

आतापर्यंतची करवाई पाहता बार्शी ड्रग्ज तस्करीत एकूण १२ आरोपी निष्पन्न झाले आहेत. त्यातील ९ आरोपी हे धाराशिव जिल्ह्यातल्या परांडा येथील तर तिघे बार्शी येथील आहेत. या १२ आरोपी पैकी ७ जण पोलिस कोठडीत असून तिघे फरार आहेत. परंडा येथील दीपक काळे आणि खांडवी येथील अय्याज शौकत शेख या २ जणांना पोलिसांनी कालच अटक केली असून त्यांना आज २५ एप्रिल रोजी कोर्टात हजर केले जाऊ शकते.

हे आहेत बार्शी ड्रग्स प्रकरणातील आरोपी

परंडा येथील असद हसन देहलुज, मेहफुज महंमद शेख, वसिम इसाक बेग, जावेद नवाबमुद्दीन मुजावर,हसन चाऊस, दीपक काळे, साजिद चाँद मुजावर, फिरोज उर्फ मस्तान रसूल शेख आणि शेळके नावाच्या अश्या ९ जणांना आरोपी केली आहे त्यातील मुजावर, शेख व शेळके हे फरार आहेत. बार्शी येथील अय्याज शौकत शेख, जमीर अन्सार पटेल आणि सरफराज उर्फ गोल्डी अस्लम शेख हे ३ आरोपी बार्शी येथील आहेत. २० ग्रॅम वजनाचे १० पुड्यासह पोलिसांनी १८ एप्रिल रोजी ३ जणांना अटक केली होती त्यानंतर तस्करीचा भांडाफोड झाला.